शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

१०० टक्के केंद्रपुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यासाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती ची नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल मार्फत सन २०१९-२० साठी अंमलबजावणी करणेबाबत डॉ. धनराज माने, शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ यांचे क्र. उशिसं-२०१९/सीएसएस/शिष्यवृत्ती/१०९२५ दिनांक २२/०८/२०१९ रोजीचे सोबतचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

(श्री. व्ही. एस. सोयम)
उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 378
दि. 26 AUG 2019

d:\2019\mangutkar\circular.docx

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune.gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ /२९७०७०९८ फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं-२०१९/सीएसएस/शिष्यवृत्ती/ 10725 दि. /०८/२०१९
22 AUG 2019

**परिपत्रक**

**विषय :- १०० टक्के केंद्रपुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती ची नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल मार्फत सन २०१९-२० साठी अंमलबजावणी करणे बाबत...**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी / मार्च २०१९ मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रेल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्रशासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी ७४१७ इतके नवीन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी **नविन मंजूरीचे आणि नूतनीकरणाचे** (Renewal) **अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने** मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पद्धतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येईल. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येईल.

- **किमान पात्रता व अटी :**

१. अर्जदार भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा/स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.
३. अर्जदाराच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा अधिक नसावे.
४. ही शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. मात्र कोणताही पदविका अभ्यासक्रम तसेच पत्राद्वारा व दूरस्थ शिक्षणासाठी (Diploma, Correspondence Courses & Distance Education) ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.
५. केंद्र शासनाच्या नियमानुसार सदर शिष्यवृत्ती, अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ४ वर्षे व वैद्यकिय अभ्यासक्रमासाठी व कला वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ५ वर्षापर्यंत देय राहील.
६. खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्याची राहील. विद्यार्थ्याचा बँक खाते क्रमांक मेजर असावा व जॉईंट खाते नसावे.

❖ **अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे:-**

- **नवीन मंजूरी / (Fresh)-**
  १. इयत्ता १२ वी ची गुणपत्रिका.
  २. पालकांचे राज्यशासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.
- **नूतनीकरण (Renewal)-**
  १. मागील वर्षाची गुणपत्रिका.

Scanned by CamScanner

शिष्यवृत्तीचे नूतनीकरणासाठी मागील वर्षाच्या परीक्षेत किमान ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

- **नविन मंजूरी आणि नूतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती :-**

१. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व नूतनीकरणासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत **दि. ३१/१०/२०१९** ही आहे. व महाविद्यालयांनी अर्जाची पडताळणी करण्याचा अंतिम **दिनांक १५.११.२०१९** हा आहे.

३. नवीन मंजूरीसाठी (Fresh) ज्या विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या Top २०th Percentile merit list मध्ये समावेश असेल, त्याच विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन (Online) भरले जातील. सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

४. ज्या विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक हा त्यांच्या बँकखात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे. ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती रक्कम सुरळीतपणे जमा होण्यास मदत होईल. ज्या विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नोंदणी केल्याचे स्लीप आहे अशा विद्यार्थ्यांनी त्यावर दिलेला क्रमांक ऑनलाईन अर्ज करतेवेळी फॉर्म मध्ये नमुद करावा.

५. तथापि एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी त्या विद्यार्थ्याने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅन कार्ड अथवा ड्रायव्हींग लायसन्सची प्रत अथवा प्राचार्यांची सही व शिक्का असलेले विद्यार्थ्याच्या ओळखीबाबतचे फोटोसह असलेले प्रमाणपत्र ईत्यादी यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी.

६. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepage वरील SOP (standard operating procedure) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

७. ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरुन, ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह आपल्या महाविदयालयाकडे पुढील कार्यवाहीकरिता सादर करावीत.

८. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या / संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा. **सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये येणे अनिवार्य आहे.**

❖ **महाविद्यालय / संस्थेसाठी सूचना :-**

१. सर्व महाविद्यालये / संस्था यांचे लॉगीन मधून ऑनलाईन पद्धतीने AISHE कोडसह NSP पोर्टलवर त्वरीत पुनर्नोंदणी करणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीचा (Fresh) किंवा नूतनीकरणाचा (Renewal) चा ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन अर्जांची छाननी करुन ऑनलाईन मंजुरी देण्याची कार्यपध्दती पार पाडावी. संबंधित महाविद्यालयांनी उच्च शिक्षण संचालनालयाने दिलेला युजर आय.डी. व पासवर्ड वापरुन विहित केलेल्या वेळेत लॉगीन करावे व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत मुदतीतच पुढील स्तरावर ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अन्यथा सदर अर्ज अपात्र समजण्यात येतील.

Scanned by CamScanner

सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०१९-२० साठी प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित प्राचार्य / संस्थाप्रमुख यांची असेल. अर्जदाराच्या सोयीसाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना व SOP (standard operating procedure) www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहे.

आपल्या अधिनस्थ महाविद्यालये, शैक्षणिक संस्था व विद्यापीठे यांना आपल्या स्तरावरुन सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी परिपत्रकाद्वारे तसेच कार्यशाळा, बैठका आयोजीत करुन सूचना देण्यात याव्यात. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास सादर करण्यात यावा.

**(डॉ. धनराज माने)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

प्रत,

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
२. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भोसलेनगर, भांबुर्डा, पुणे ०५
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, मुंबई ०१
४. संचालक, आयुर्वेद व युनानी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
५. संचालक, आरोग्य संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (कृषी/अकृषि/तंत्र/पशुविज्ञान/आरोग्य विज्ञान)

२/- सदर शिष्यवृत्तीसाठी आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांमधील विद्यार्थीही पात्र असल्याने सदरचे परिपत्रक आपल्या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच याबाबत संबंधितांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

Scanned by CamScanner